महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
सत्यमेव जयते
पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा.
९३, मल्हार पेठ, सातारा.
दुरध्वनी क्रमांक ०२१६२-२३२२२५
ई-मेल आय डी- sp.satara@mahapolice.gov.in

जा.क्र /जिवानिशा/वाहतुक अधिसुचना/१०७/२०२६ पोलीस अधीक्षक कार्यालय सातारा दिनांक - २५/०३/२०२६

# अधिसुचना

पाटण पोलीस ठाणे हद्दीतुन जाणारा कराड ते चिपळुण राष्ट्रीय महामार्ग क्र. १६६ ई या महामार्गावर पाटण शहरातील धांडे पुलाची पुर्नबांधणी आणि बाजारपेठेतील क्रॉक्रीट रस्त्याचे काम करणेचे असलेने सदर मार्ग सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी पूर्णतः बंद करुन पुलाची पुर्नबांधणी आणि बाजारपेठेतील क्रॉक्रीट रस्त्याचे काम पुर्ण करणेकरीता ६० दिवस कालावधी लागणार असलेने तोपर्यत नागरीकांची तसेच वाहनचालकांची गैरसोय होवु नये याकरीता सदर मार्गावरील वाहतूकीचे नियोजन करणे आवश्यक आहे. त्या करीता पर्यायी मार्गाची उपलब्धता असलेने सदर मार्गावरील वाहतुक वळविणे आवश्यक आहे. त्याबाबतची अधिसुचना प्रसिद्ध करणेत येत आहे.

मी तुषार दोशी भापोसे, पोलीस अधीक्षक सातारा, मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३४ अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारान्वये पाटण शहरातुन जाणारा कराड ते चिपळुण राष्ट्रीय महामार्ग क्र. १६६ ई वरील वाहतूक मार्गात बदल करुन वाहतुक व्यवस्था सुरळीत राहणेकरीता दि. २७/०३/२०२६ चे ००.०१ ते २७/०५/२०२६ चे २३.५९ वा. पर्यत खालील अधिसुचना पारित करीत आहे.

## वाहतुक मार्गातील बदलाबाबत

## वाहतुक मार्गातील बदल खालीलप्रमाणे करण्यात आला आहे.

१. **कराड व उंब्रज बाजुकडुन चिपळुण कडे जाणारी अवजड वाहतुक :-**
करा़ड व उंब्रज येथुन सरळ राष्ट्रीय महामार्ग क्र. ०४ वरुन पाचवड फाटा - उंडाळे - कोकरुड - मलकापुर - आंबा घाट - संगमेश्वर वरुन चिपळुन कडे जाईल.

२. **चिपळुन कडुन कराड व उंब्रज कडे येणारी अवजड वाहतुक :-**
चिपळुन वरुन संगमेश्वर - आंबा घाट - मलकापुर - कोकरुड - उंडाळे - पाचवड फाटा - राष्ट्रीय महामार्ग क्र. ०४ वरुन कराड, उंब्रज कडे जाईल.

३. **कराड व उंब्रज बाजुकडुन चिपळुण कडे जाणारी सर्व हलकी वाहतुक :-**
कराड व उंब्रज येथुन नवारस्ता - गव्हाणवाडी फाटा - नेरळे गौंड येथुन कराड ते चिपळुन महार्गावरुन चिपळुन कडे जातील.

४. **चिपळुण बाजुकडुन कराड उंब्रज कडे येणारी सर्व हलकी वाहतुक :-**
चिपळुन कडुन येणारी वाहतुक नेरळे गौंड - गव्हाणवाडी फाटा - नवारस्ता मार्गे कराड व उंब्रज कडे जातील.

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

तरी वरील वाहतूक ज्या ज्या ठिकाणावरुन वळविण्यात आली आहे. त्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला आहे. वरील वाहतूक मार्गात केलेल्या बदलांबाबत सर्व नागरीकांनी व वाहन चालकांनी नोंद घेवून पोलीस दलास सहकार्य करावे.

सदरची अधिसुचना माझ्या स्वाक्षरी व शिक्यानिशी दिनांक २५/०३/२०२६ रोजी जारी करण्यात आली आहे.

SUPDT. OF POLICE SATARA

(तुषार दोशी) भापोसे
पोलीस अधीक्षक सातारा

ठिकाण - सातारा
दिनांक - २५/०३/२०२६
प्रति,

१) मुद्रण व्यवस्थापक, कारागृह मुद्रणालय, पुणे
२/- महाराष्ट्र राजपत्रकामध्ये आदेश प्रसिध्द करुन प्रति रेकॉर्डकरता पाठविणेबाबत.
२) जिल्हा माहीती अधिकारी, सातारा यांना वृत्तपत्रात प्रसिध्दी करण्यासाठी.
३) संपादक/प्रतिनिधी, दैनिक ऐक्य, पुढारी, लोकसत्ता,लोकमत, तरुण भारत, सकाळ, सामना, ग्रामोध्दार, पुण्यनगरी, महाराष्ट्र टाईम्स, तिरंगा, मुक्तागीरी, जिव्हाळा यांना वृत्तपत्रात प्रसिध्द करणेसाठी
४) पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण, सांगली, पुणे ग्रामीण ,रत्नागिरी ,कोल्हापूर
२/- सदर आदेशाची प्रसिध्दी आपल्या कार्यक्षेत्रातील स्थानिक वृत्तपत्रामध्ये करणेस विनंती.
५) सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सातारा जिल्हा.
६) सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी सातारा जिल्हा.

प्रत माहीतीसाठी सादर

८) मा.विशेष पोलीस महानिरीक्षक कोल्हापुर परिक्षेत्र कोल्हापुर.
९) मा.जिल्हाधिकारी सातारा.
१०) पोलीस अधीक्षक,महामार्ग परिक्षेत्र पुणे.

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner
Scanned with CamScanner